**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/284/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 दिनांक : 15/08/2024

## 1)खुन :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 14.08.2024 रोजी चे 00.30 वा. चे सुमारास, **काळेश्वरनगर विष्णुपूरी नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीचे तिचे मित्रासोबत अनैतिक संबध व्यवस्थीत चालु ठेवण्याचे उदेशाने तीचा नवरा (फिर्यादीचा मुलगा) **मयत नामे खेमसिंग पि. रेखासिंग पुजारी, रा. काळेश्वरनगर श्री गुरूरामदास नगर विष्णुपूरी ता. जि. नांदेड** यांचे सोबत भांडण करून शिवीगाळ करून डोक्यात लोखंडी रॉड घालुन खुन केला. वगैरे **फिर्यादी रेखासिंग पि. भिमसिंग पुजारी, वय 63 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. काळेश्वरनगर श्री गरू रामदास नगर विष्णुपूरी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 730/2024 कलम 103(1), 352, 351(2)(3) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.नं. 9823031227** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**शिवाजीनगर :—** दिनांक 13.08.2024 रोजी चे 12.30 वा. चे सुमारास, **गॅस गोडाऊन रोडवर नवा मोंढा नांदेड येथे,** यातील फिर्यादी एसबीआय बँक नवा मोंढा नांदेड येथुन नगदी 50,000/–रू काढुन घराकडे पायी जात असतांना गॅस गोडावुन रोडवर नवा मोंढा नांदेड येथे आले असता त्याच्या समोरून एक नंबर नसलेल्या मोटार सायकलवर दोन अज्ञात इसम वय अंदाजे 30 ते 35 वयोगटाचे बारीक कटिंग केलेले अंगाने जाडसर व अंगात गुलाबी शर्ट असलेला मोटार सायकल चालवणारा तोंडाला बांधुन होता तर मागील तोंडाला न बांधलेला होता. मागील इसमाने फिर्यादीने ठेवलेली पर्स ज्या पर्स मध्ये पन्नास हजार रूपये असलेली ती पर्स जबरीने हाताला झटका मारून चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अंकीता भ्र. एकनाथ तुपसंमीदर, वय 26 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. वैशाखीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 329/2024 कलम 309(4), 3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2547 श्री वाघमारे, मो. नं. 8669005593** हे करीत आहेत.

## 3)चोरी :—

**1)अर्धापुर :—** दिनांक 14.08.2024 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **स्टेट बँक ऑफ शाखा अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा अर्धापुर शाखेतुन 1,00,000/–रू उचलुन 50,000/–रू पॅन्टच्या समोरील खिशात व 50,000/–रू वॉच पॉकेटमध्ये ठेवले व बँकेत चेक जमा करण्यासाठी गर्दीत लाईनमध्ये उभा राहीला असता दोन अनोळखी इसमाने वय अंदाजे 22 ते 25 वयोगटाचे यांनी गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीचे पुढचे खिशात ठेवलेले 50,000/–रू कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सदाशिव लक्ष्मण गुंजकर, वय 45 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. चाभरा ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 442/2024 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1839 कांबळे, मो.नं. 9823343366** हे करीत आहेत.

## 4)जनावर चोरी :—

**1)कुंटूर :—** दिनांक 14.08.2024 रोजी चे 01.00 ते 04.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे शेत मौ. देगाव शिवार ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे मौजे देगाव शिवारातील शेतातील आखाडयावर बांधलेले दोन गाई, दोन कारवडी, दोन गोरे, असे किंमती 69,000/–रू चे जनावरे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी राजेश व्यंकट मोरे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. देगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 161/2024 कलम 303 (2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 श्री कंधारे, मो.नं. 8856080025** हे करीत आहेत.

**2)सोनखेड :–** दिनांक 13.08.2024 रोजी चे 22.30 ते दिनांक 14.08.2024 चे 01.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घराजवळ मौ. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीने बांधुन ठेवलेले जनावरे चोरून नेण्याचा प्रयत्न करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी बालाजी शिवाजी मोरे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 146/2024 कलम कलम 303 (2), 62, 3 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2342 श्री हंबर्डे, मो.नं. 9284422052** हे करीत आहेत.

## 5)मंदीरातील दानपेटीतील चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 13.08.2024 रोजी चे 23.45 ते दिनांक 14.08.2024 चे 06.00 वा. चे दरम्यान, **श्री नागेश्वर तिर्थक्षेत्र मंदीराचे मोकळया जागेत मौ. खुरगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व गावातील लोक मंदीरात पुजा करण्यासाठी गेले असता मंदीराच्या समोरील मोकळया जागेतील पत्र्याची दान पेटी फुटलेली दिसल्याने पाहाणी केली असता अंदाजे 25,000/–रू कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी संदीप मल्लीकार्जन पटणे, वय 28 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. खुरगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 393/2024 कलम 334(1), भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2252 तोडसाम, मो.नं. 7720839111** हे करीत आहेत.

## 6)आत्महत्येस प्रवृत केले :–

**वजिराबाद :–** दिनांक 01.07.2023 रोजी चे 10.00 ते दिनांक 14.08.2024 चे 11.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी पंचशिलनगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून **मयत नामे आरती नागेश काशिदे, वय 23 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. पंचशिलनगर नांदेड,** हिस तुझे माहेरच्यानी लग्नात हुंडा दिला नाही, तुझ्या माहेरहुन पैसे घेवुन ये म्हणुन तीला सतत घराचे बाहेर काढुन शिवीगाळ व मारहाण करून त्रास दिला. आरोपीतांचे त्रासाला कंटाळुन मुलीने आत्महत्या केली. यातील नमुद आरोपी हे तिला आत्महत्या करणेस प्रवृत केले. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 412/2024 कलम 108, 85, 3(5) भा.न्या.सं.–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हालसे, मो.क्रं. 9552781091** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**मनाठा :–** दिनांक 13.08.2024 रोजी चे वेळ 07.00 वा. सुमारास, **मौ. बामणी फाटा त्याचे समोरील शिबदरा आबादी जवळ ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1)खंड मारोती डाके, वय 22 वर्षे, रा. समदरवाडी ता. होकर 2)अरूणबाई परमेश्वर वागतकर, वय 42 वर्षे, रा. वाळकेची वाडी ता. हिमायतनगर** जखमी नामे **भारत बाई** हे तिघेजण मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एयु–7842 ने पावनमारी येथे जात असतांना शिबदरा आबादीचे वळण रस्त्यावर क्रुझर गाडी क्रमांक एमएच–20/ईई–0687 चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मयताचे मोटार सयाकल समोरून जोराची धडक देवुन यातील मयताचे मरणास व जखमी होणेस कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी मारोती लक्ष्मण डाके, वय 66 वर्षे, व्यवसाय शेती रा. समंदरवाडी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 132/2024 कलम 281,106(1)(2),125 (ब) भारतीय न्याय संहीता–2023 सह कलम 134 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.नं. 9970073425** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)विमानतळ :–**दिनांक 14.08.2024 रोजी चे 00.40 वा. चे सुमारास, **मौ. कामठा शिवार म्हैस बाजाराचे बाजुस मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या अंदर बाहर हरजीत नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 5,000/–रूपये, व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दिगांबर ज्ञानेश्वर कल्याणकर, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे विमानतळ** गुरनं 314/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1986 श्री कानगुले, मो.नं. 9657707486** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–**दिनांक 14.08.2024 रोजी चे 16.10 वा. चे सुमारास, **जयभिमनगर देगलुर येथील रोकडा हनुमान मंदीर जवळ सार्वजनिक रोड लगत देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2040/–रूपये, व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2613 साहेबराव जमनाजी सगरोळीकर, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे देगलुर** गुरनं 391/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2562 पत्रे, मो.नं. 9823203404** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 285/2024 दिनांक : 15.08.2023**

**नांदेड पोलीस दलातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना विशेष सेवा पदक प्रदान...**

नांदेड पोलीस दलातील अकरा पोलीस अधिकारी व एक पोलीस अंमलदार असे एकुण 12 जणाना नक्षलवादी भागात त्यांनी केलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल मा. पोलीस महासंचालक म. रा. मुंबई यांचे विशेष सेवा पदक घोषीत झाले आहे.

मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे विशेष सेवा पदक घोषीत झाले असल्याने 15 ऑगष्ट, स्वातंत्र्य दिनी **मा. श्री अभिजित राऊत**, जिल्हाधीकारी नांदेड यांच्या हस्ते खालील पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांना विशेष सेवा पदक प्रदान करून गौरविण्यात आले आहे.

या प्रसंगी **मा. श्री शहाजी उमाप**, पोलीस उप–महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र नांदेड, **मा. श्री आबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्रीमती मिनल करणवाल**, मुख्य कार्यकारी अधीकारी जिल्हा परिषद नांदेड, **मा. डॉ. महेशकुमार डोईफोडे,** आयुक्त मनपा नांदेड, अपर जिल्हाधिकारी **मा. श्री बोरगावकर** हे हजर होते.

**विशेष सेवा पदक प्राप्त पोलीस अधीकारी व पोलीस अंमलदार यांचे नावे खालील प्रमाणे**

| अ.क्रं. | पोलीस अधीकारी यांचे नाव | पद | नेमणुक ठिकाण |
|---|---|---|---|
| 01 | श्री सागर सुभाषराव झाडे | पोउपनि | पोस्टे किनवट |
| 02 | श्री शिवाजी सिताराम शिंदे | पोउपनि | पोस्टे मुदखेड |
| 03 | श्रीमती वैशाली निवृती कांबळे | पोउपनि | पोस्टे सोनखेड |
| 04 | श्रीमती प्रियंका पवार | मपोउपनि | पोस्टे धर्माबाद |
| 05 | श्री नारायण मारोती शिंदे | पोउपनि | पोस्टे कोंडलवाडी |
| 06 | श्री राजेश मारोती नंद | पोउपनि | नियंत्रण कक्ष नांदेड |
| 07 | श्री निजाम मुसा सय्यद | पोउपनि | पोस्टे लिंबगाव |
| 08 | श्री प्रदिप गोरखनाथ साखरे | पोउपनि | पोस्टे विमानतळ |
| 09 | श्री नरेश केशव वाडेवाले | पोउपनि | पोस्टे भाग्यनगर |
| 10 | श्री सचिन मुकूंदराव आरमाळ | पोउपनि | पोस्टे उमरी |
| 11 | श्री उमेश किशनराव कदम | पोउपनि | पोस्टे शिवाजीनगर |
| 12 | श्री अशिष प्रभु माने | पेना/2048 | पोलीस मुख्यालय |

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



